ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 450-M (RS)**

**Code No. : 450-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ

# D.El.Ed. SECOND YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)

# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( HPS )

# FIRST LANGUAGE – MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 09. 01. 2020 ]

Date : 09. 01. 2020 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचनांप्रमाणे लिहीणे आवश्यक आहे.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य ते उत्तर निवडुन लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे : 10 × 1 = 10

1. मूल प्रथम यांची भाषा शिकते –

   (अ) पित्याची (आ) आईची

   (इ) घरच्या लोकांची (ई) शाळतील शिक्षकांची.

2. प्रथमता शाळेत येणारे मूल किमान इतक्या शब्दांचा वापर करते –

   (अ) 8000 शब्दांचा (आ) 14000 शब्दांचा

   (इ) 2500 शब्दांचा (ई) 2000 शब्दांचा.

3. शिक्षका जवळ शब्द भांडार इतका असावा –

(अ) विपूल (आ) साधारण

(इ) मर्यादित (ई) ज्ञान देण्यापुरता.

4. मूल आपले विचार, भावना, आवडीनिवडी याद्वारे आत्मसात करते.

(अ) खेळाद्वारे (आ) श्रवणाद्वारे

(इ) हावभावाद्वारे (ई) संभाषणाद्वारे.

5. संभाषण म्हणजे हे होय –

(अ) एकाने चांगले बोलणे व दुसऱ्याने ऐकणे

(आ) दोन व्यक्तींनी एकमेकांशी परस्पर बोलणे

(इ) आपापसात कुजबूज करणे

(ई) चांगले व्याख्यान देण.

6. अवधान म्हणजे हे आहे –

(अ) लक्ष केंद्रित करणे (आ) श्रवण करणे

(इ) ग्रहन करणे (ई) आकलन करणे.

7. आशुभाषण म्हणजे हे होय –

(अ) अचानक बोलणे

(आ) जास्त तयारी करुन बोलणे

(इ) तयारी नसताना बोलणे

(ई) दिलेल्या वेळेत, दिलेल्या विषयाबद्दल बोलणे.

8. लेखनात याला अधिक महत्व आहे –

(अ) हस्ताक्षराला (आ) निबंध लेखनाला

(इ) श्रुतलेखनाला (ई) अनुलेखनाला.

9. वाचनाचे मूल्यमापन करताना या कृती द्याव्यात –

(अ) एखादा विषय देवून त्यावर संभाषण करण्यास लावणे

(आ) वाचन उद्देशाला अनुसरुन, प्रश्न तयार करुन ते विचारणे, तसेच प्रकट वाचन करण्यास सांगणे

(इ) एखादी गोष्ट सांगून ती गोष्ट पुन्हा सांगण्यास लावणे

(ई) एखाद्या घटनेवर आधारीत निबंध लेखन करण्यास सांगणे.

10. मुलांचे वाचन सुधारण्यासाठी हे उपयोगी पडते.

(अ) मुक्त वाचन (आ) मुकवाचन

(इ) प्रकट वाचन (ई) मौनवाचन.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : 5 × 2 = 10

11. साहित्य वाचनाने मुलांचा भावनात्मक विकास कसा होतो ?
12. शिक्षकांने वर्गात अध्यापन करताना शैक्षणिक साधनांचा वापर करण्याचे प्रयोजन काय ?
13. साहित्याचे विविध प्रकार सांगा.
14. भाषा अध्ययन अनुकूल करण्याच्या दोन पद्धती स्पष्ट करा.
15. भाषा अध्ययनाचा प्रचलित संदर्भ स्पष्ट करा.
16. मौखिक कृतीत लक्षात ठेवावयाच्या कोणत्याही चार अंशांची यादी तयार करा.
17. वाचन आणि लेखन यातील फरक स्पष्ट करा.
18. शिक्षक या नात्याने तुम्ही मुलांना वाचन करण्यास कस प्रोत्साहन द्याल ?

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नात निवड दिलेली आहे. त्यातोल एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) भाषा हे एक चिंतनाचे माध्यम आहे. स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषेचे कार्य सविस्तर स्पष्ट करा.

20. अ) मुलाला त्याच्या घरच्या भाषेतून शाळेच्या भाषेत रूपांतर करताना शिक्षकांने कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत ?

**किंवा**

आ) पाठ नियोजन म्हणजे काय ? पाठ नियोजनाची आवश्यकता स्पष्ट करा.

21. अ) वर्गात भाषा अध्ययनाची अनुकूलता निर्माण करण्यास शिक्षकांने कोणते उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे ?

**किंवा**

आ) रचनावादी सिद्धांताच्या ( 5E ) पायऱ्यांचे क्रमाने विश्लेषण करा.

22. अ) भाषा अध्यापनाच्या मूल्यमापनात लक्षात ठेवावयाचे अंश कोणते ? चर्चा करा.

**किंवा**

आ) 'बहुभाषा वर्ग हे भाषा अध्ययन प्रक्रिया समृद्ध करतात.' चर्चा करा.

23. अ) विद्यार्थ्यांचे श्रवण सामर्थ्य समजून घेण्यास काय केले पाहिजे ?

**किंवा**

आ) 'श्रवण कौशल्य हे भाषा शिक्षणाचा पाया आहे.' स्पष्ट करा.

24. अ) श्रवणातून आनंद मिळविण्यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम राबविता येतील ? विवरण द्या.

**किंवा**

आ) मराठी भाषेच्या अध्यापकाने प्रयत्न करून दूर करावयाच्या भाषण कौशल्यामधील उणिवा कोणत्या ? ते सांगा.

25. अ) वाचन कौशल्य विकासासाठी शाळेत शिक्षक या नात्याने काणते उपक्रम राबवाल ?

**किंवा**

आ) वाचन क्लब म्हणजे काय ? तो कसा चालवावा ? स्पष्ट करा.

26. अ) लेखन प्रक्रियेच्या पाच पायऱ्या स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी शाळेत शिक्षकांने कोणते उपक्रम योजले पाहिजे ?